# प्रेसनोट

दि.३०/०४/२०२०

## महामार्ग पोलीस केंद्र वडगांव (उर्से टोलनाका) जिल्हा पुणे येथील सहायक पोलीस निरीक्षकावर लाच स्विकारलेणी कारवाई

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | तळेगांव दाभाडे पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय येथे गुन्हा रजिस्टर नंबर ३४१/२०२० अन्वये नोंद करण्यात आला आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम – ७,<br>भारतीय दंड संहीता कलम २७९,३३६ |
| आरोपीचे नाव व कार्यालय | लोकसवेक - सत्यजित रामचंद्र अधटराव, सहायक पोलीस निरीक्षक (वर्ग -२) नेमणुक महामार्ग पोलीस मदत केद्र वडगांव ता. मावळ जिल्हा पुणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २०,०००/- |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १५,०००/- |
| थोडक्यात माहिती. | पडताळणी दिनांक :- २९/०४/२०२०<br>सापळा दिनांक :- २९/०४/२०२०<br>तक्रारदार हे एका रोड लाईन्सचे हायड्रोलीक्स/एक्सेल गाडीवर चालक असून त्यांच्याकडील वाहनामधून पवनचक्कीचे नेसल घेवून जात असताना त्यांची दोन वाहने पुणे मुंबई द्रतगती मार्गावर उर्से टोलनाका येथे अडवून ठेवली होती. ती वाहने लॉकडाउन उठल्यानंतर सोडली जाईल असे तक्रारदार यांना सांगून लगेच सोडायची असल्यास प्रत्येक गाडीचे १०,०००/- रुपये असे एकुण २०,०००/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती १५,०००/- रुपये लाचेची मागणी करुन स्विकारली.<br>त्यानंतर आरोपी लोकसेवक अधटराव यास संशय आल्याने लाच रक्कम तेथेच फेकून त्याच्याकडील मारुती स्विफ्ट डिझायर कार नंबर एम.एच/४२/ए.एच/१८११ मधून पळून जात असताना सापळा पथकातील अधिकारी पो.नि. सुनिल बिले यांनी अडविण्याचा प्रयत्न केला असता पो.नि. बिले यांची सुरक्षितता धोक्यात येईल अशाप्रकारे बेदरकारपणे, हयगयीने त्याचे ताब्यातील स्विफ्ट कार धोकादायकपणे भरधाव वेगाने चालवून पळून गेल्याने त्याचे विरूद्ध वरीलप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. |

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे व मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. संजय पाटील, यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकावर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस उप-आयुक्त/पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. ॲन्टीकरप्शन ब्युरो, पुणे -
   दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी- पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**

( श्रीहरी पाटील )
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक(प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे युनिट.